अर्ज नि.क्र.३१. 1 नियमित दिवाणी दावा क्र. **३८८/२०१९**

CNRNO.MHLA140009662019 श्री. स्वरुप बाजुळगे वि. श्री. वैजनाथ शिंदे + ०१

## अर्ज निशाणी क्रमांक ३१ वर आदेश

(पारीत केलेला दिनांक **१७.०७.२०२३**)

**०१**. प्रस्तूत अर्ज प्रतिवादींनी वादपत्रावर आज दिनांक **१७.०७.२०२३** रोजी "**प्रतिवादीचा पुरावा बंद केल्याचा"** आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

**०२**. प्रस्तूत अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

**०३**. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**०४**. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादीच्या साक्षीपुराव्याची आज पहिलीच तारीख आहे. प्रतिवादीची मोटार सायकल ही पंक्चर झाल्यामुळे प्रतिवादी हे आज रोजी सकाळी लवकर न्यायालयात हजर राहून साक्ष पुराव्याचे शपथपत्र दाखल करु शकला नाही. म्हणून वादपत्रावरील **"प्रतिवादींचा पुरावा बंद करण्याचा"** झालेला आदेश रद्द करणे उचित आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.३१** मंजूर करण्यात येतो.

२. वादपत्रावर आज **"प्रतिवादीचा पुरावा बंद करण्याचा"** झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.07.17 17:43:59 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :- १७.०७.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :- औसा. जिल्हा लातूर.**